९०५८३

क्रमांक :- / ग-२,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १९ ऑक्टोबर, २०२६

:: प रि प त्र क ::

संदर्भ:- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१६७०९/क-१, दिनांक २८ सप्टेंबर, २०२६

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन विधान भवन, नागपूर येथे दिनांक ७ डिसेंबर, २०२६ रोजीपासून सुरू होणार आहे. आगामी हिवाळी अधिवेशनासाठी घेऊन जावयाची कागदपत्रे व कार्यालयीन अभिलेखे, इत्यादी सामुग्री भरलेले ट्रक दिनांक २८ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत नागपूर येथे पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर सामुग्रीने भरलेले ट्रक मुंबईहून दिनांक २६ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता रवाना करण्यात येतील.

त्यादृष्टीने सर्व संबंधित कक्षांनी आपले अभिलखे कोरुगेटेड खोक्यात भरुन सदर खोके दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत "ग-२" कक्षाच्या ताब्यात देण्याची व्यवस्था करावी. तद्नंतरही अभिलेखे खोक्यात भरुन देण्याचे संबंधित कक्षांकडून राहिल्यास त्या कक्षातील संबंधित कर्मचाऱ्यास नागपूर येथे स्वतःच्या जबाबदारीवर ते न्यावे लागतील. संबंधित कक्षांना पुरविण्यात येणारे जाड पुठ्ठयांचे कोरुगेटेड खोके सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे त्यांना दिनांक १६ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येतील.

अत: सर्व कक्षांच्या कक्ष अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, अधिवेशनासंबंधी अत्यावश्यक नस्त्या, अहवालाच्या प्रती इ. **महत्वाचे अभिलेखे आवश्यकतेनुसारच घेण्यात यावेत** तसेच मागाहून जाणाऱ्या कक्षांच्या कक्ष अधिकाऱ्यांनी त्यांच्या कक्षाशी संबंधीत असलेले कार्यालयीन अभिलेखे ट्रकमधून नागपूर येथे पाठविल्याची कटाक्षाने खात्री करुन घ्यावी अन्यथा नागपूरला जातेवेळी ती स्वत:बरोबर घेऊन जाण्याची व्यवस्था करावी किंवा संबंधित कक्षाच्या मागाहून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ती स्वत:बरोबर घेऊन जावीत.

..२/

अभिलेखे नागपूर कार्यालयात नेण्यासाठी ट्रकमध्ये भरले आहेत याची खात्री करुन घेणे व नागपूर येथील कार्यालयात उतरवून घेण्याकरिता कक्ष अधिकारी यांनी त्यांच्या कक्षातील कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी व अभिलेखे भरतेवेळी/उतरतेवेळी (लोडींग/ अनलोडींग) ते उपस्थित राहतील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे नागपूर येथे सभागृहात सादर होणाऱ्या अहवालांच्या प्रती नागपूरहून मुंबईला परत आणण्याकरिता अंदाजे किती जादा खोके लागतील याची माहिती देखील संबंधित कक्षांनी "ग-२" कक्षाला दिनांक १६ नोव्हेंबर, २०२६ पूर्वी द्यावी. मा.समिती प्रमुखांच्या कार्यालयाचे अभिलेखे देखील कार्यालयाच्या अभिलेख्यांसोबतच ट्रकमधून पाठविण्यात येणार असल्याने सर्व मा.समिती प्रमुखांच्या स्वीय सहाय्यकांनी आपले अभिलखे कोरुगेटेड खोक्यामध्ये भरुन देण्याची व्यवस्था करावी.

कोरुगेटेड खोक्यांचा वापर केवळ कार्यालयीन अभिलेख्यांसाठीच करावयाचा असल्याने मुंबई व नागपूर येथे खोके बंद करण्यापूर्वी सुरक्षा विभागाकडून त्यांची तपासणी करुन घेऊन नंतरच खोक्यांना तारा लावण्यात येतील. कोरुगेटेड खोक्यांच्या वाटपाचे परिशिष्ट सोबत जोडले आहे. नागपूर येथे जादा खोके उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत.

तसेच प्रत्येक वर्षी साधारणत: ६५० ते ७०० कोरुगेटेड खोक्यांमधून कार्यालयीन अभिलेखे ट्रकमधून नागपूर येथे नेण्यात व परत आणण्यात येतात. अत्यंत महत्वाचे अभिलेखे नेण्यासाठी लोखंडी ट्रकांचा वापर केला जातो. तथापि, गतवर्षी लोखंडी ट्रंका जास्त प्रमाणात प्राप्त झाल्याने त्या ट्रकमध्ये भरणे व उतरविणे अत्यंत गैरसोईचे व अडचणीचे झाले. तसेच काही ट्रंका अतिवजनामुळे तुटून खराब झाल्या आहेत.

सबब, अत्यंत महत्वाचे अभिलेखे नेण्याकरिता यावर्षी अवर सचिव व त्यावरील अधिकाऱ्यांना तसेच 'अ'-१, 'क-१' आस्थापना, 'क-४' अर्थसंकल्प, 'क-२', 'क-३', 'ई-२', 'ग-१', 'ग-२', 'ह', या कक्षांना प्रत्येकी एक लोखंडी ट्रंक नेण्यास अनुमती देण्यात येत असुन या व्यतिरिक्त लोखंडी ट्रंक घेतली जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(विजय कोमटवार)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रत माहितीसाठी :-

१) मा.पीठासीन अधिकारी व मा.उप पीठासीन अधिकारी यांचे सचिव तसेच खाजगी सचिव व त्यांची कार्यालये.
२) विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

:: परिशिष्ट ::

सन २०२६ च्या आगामी हिवाळी अधिवेशनासाठी विविध कक्षांना करण्यात येणाऱ्या कोरुगेटेड खोक्यांचे वाटप तसेच लोडींग/अनलोडींगसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याचे नांव

अ.क्र (१)	कक्षाचे नाव (२)	मोठे (३)	लहान (४)	लोडींग/अनलोडीं कर्मचाऱ्याचे नांव (५)
१.	अ (विधानसभा विधीविधान) कक्ष		----	
२.	ब (विधानसभा प्रश्न) कक्ष		----	
३.	क-१ (आस्थापना)		----	
४.	क-२ (संगणक) कक्ष		----	
५.	क-४ (अर्थसंकल्प) कक्ष		----	
६.	ड-३ (लेखा) कक्ष		----	
७.	ड-१ (लोखलेखा समिती) कक्ष		----	
८.	ड-२ (सार्वजनिक उपक्रम समिती) कक्ष		----	
९.	ड-३ (अंदाज समिती) कक्ष		----	
१०.	ड-४ (अनु.जाती कल्याण समिती) कक्ष		----	
११.	ड-५ (विमुक्त जाती व भटक्या जामती कल्याण समिती) कक्ष		----	
१२.	ड-६ (पंचायती राज समिती) कक्ष		----	
१३.	ड-७ (रोजगार हमी योजना समिती) कक्ष		----	
१४.	ड-८ (अनु.जमाती व कल्याण समिती) कक्ष		----	

अ.क्र (१)	कक्षाचे नाव (२)	मोठे (३)	लहान (४)	लोडींग/अनलोडीं कर्मचाऱ्याचे नांव (५)
अ.क्र (१)	कक्षाचे नाव (२)	मोठे (३)	लहान (४)	शेरा (५)
१५.	ड-९ (विनंती अर्ज/नियम समिती,विधानसभा) कक्ष		----	
१६.	ड-१० (विशेष हक्क समिती, सभा/परिषद) कक्ष		----	
१७.	ड-११ (उप विधान समिती) कक्ष		----	
१८.	ड-१२ (इतर मागासवर्गय कल्याण समिती) कक्ष		----	
१९.	ड-१३ (आश्वासन समिती,परिषद) कक्ष		----	
२०.	ड-१४ (आश्वासन समिती, विधानसभा) कक्ष		----	
२१.	ड-१५ (विनंती अर्ज/नियम समिती, परिषद) कक्ष		----	
२२.	ड-१६ (महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती) कक्ष		----	
२३.	ड-१८ (अल्पसंख्यांक समिती) कक्ष		----	
२४.	ई-१ कक्ष		----	
२५.	ई-२ कक्ष		----	
२६.	फ कक्ष		----	
२७.	ग-१ (सामान्य) कक्ष		----	
२८.	ग-२ कक्ष		----	
२९.	ह (सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतन) कक्ष		----	
३०.	य (अनुवाद तथा संपादन) कक्ष		----	

..३/-

अ.क्र	कक्षाचे नाव	मोठे	लहान	लोडींग/अनलोडीं कर्मचाऱ्याचे नांव
(१)	(२)	(३)	(४)	(५)
अ.क्र	कक्षाचे नाव	मोठे	लहान	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
३१.	ज (ग्रंथालय) कक्ष			
३२.	क्ष (प्रतिवेदन/फितध्वनीमुद्रण व टंकलेखन) कक्ष		----	
३३.	ल (जनसंपर्क) कक्ष		----	
३४.	वि.स.पागे प्रशिक्षण केंद्र		---	
३५.	मराठी भाषा समिती			
३६.	मा.सभापतींचे कार्यालय		----	
३७.	मा.अध्यक्षांचे कार्यालय		----	
३८.	मा.उप सभापतींचे कार्यालय		----	
३९.	मा.विरोधी पक्षनेता (सभा) यांचे कार्यालय		----	
४०.	मा.विरोधी पक्षनेता (परिषद) यांचे कार्यालय		----	
४१.	विविध समिती प्रमुख यांचे कार्यालय		१८	
४२.	अधिकारी वर्ग		----	
४३.	सुरक्षा कार्यालय		----	
४४.	विविध पक्ष कार्यालये		----	

****

D:\d drive\misg२-००२\d\२०२३-२०२४\२०१७\NAGPUR SESSION-२०१७\२०२६\NAGPUR PARIPATRAK.doc